# इमराठी गावी

विश्वनाथ खैरे
उमादेवी खैरे



संमत

# इमराठी गाणी

संमत प्रकाशन : ५
पहिली आवृत्ती : २६ जानेवारी १९९३
दुसरी आवृत्ती : १४ एप्रिल २००१

**प्रकाशक**
उमादेवी खैरे
संमत प्रकाशन
३७४, सिंध सोसायटी
औंध, पुणे ४११ ००७.

**मुद्रक**
महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय
'आर्यभूषण भवन'
पुणे ४११ ००४.

**लेखक**
विश्वनाथ खैरे
उमादेवी खैरे

**चित्रक**
यशोदा अवचट
सचीन रास्ते

१५

ISBN 81-85280-04-5

# Eमराठी गाणी

मातुश्री सिंधूबाई राणे
यांच्या चरणी

# भूमिका

इमराठी गाणी म्हणजे इंग्रजी बाळगाण्यांवर आधारलेली मराठी गाणी. इमराठी या नावात इंग्रजी व मराठी या भाषांच्या नावांचा संगम आहे. इमराठी गाण्यांमध्ये संस्कृती-संगम साधण्याचा प्रयत्न आहे. इमराठी गाणी अमराठी नाहीत.

मराठी समाजात 'चांदोबा चांदोबा भागलास का' यासारखी परंपरेने चालत आलेली बाळगाणी आहेतच. ती अज्ञात भूतकाळातल्या सामाजिक परिसरात उदयाला आली आणि केवळ मुखी परंपरेने आपल्यापर्यंत पोचली. ती मराठी आहेत; तरी इतिहासकाळात मराठी समाजावर बाहेरून जे प्रभाव पडले त्यांचा परिणाम त्यांच्या आशयात आणि शब्दरूपात दिसून येतोच. याच गाण्यातल्या 'मामाचा वाडा चिरेबंदी' या लहानशा ओळीतल्या तीन शब्दांमध्ये तीन सामाजिक ऐतिहासिक प्रभाव दिसून येतात : मामा हा मायेच्या माहेराचा सामाजिक प्रतिनिधी; वाडा हे शेतीसंस्कृतीतल्या एकत्र कुटुंबाचे वास्तुमय प्रतीक; तर चिरेबंदी बांधणीत यंत्रपूर्व काळातल्या सरंजामी वैभवाची आणि चोराचिलटांच्या किंवा आक्रमकांच्या प्रतिकाराची आठवण! आजचे मराठी बाळ ही ओळ ऐकते किंवा म्हणते तेव्हा या तिन्ही गोष्टी त्याला वस्तुरूपाने दिसणेसुद्धा काहीसे कठीण आहे. तरी 'मामाच्या वाड्यात येऊन जा' असे चंद्राला म्हणणारे मूल मराठी संस्कृतीत वाढत आहे असे आपण मानतो.

त्याच संस्कृतीत आजच्या युगातले सर्वगामी विज्ञान मुरवून घ्यावे म्हणून 'चांदोबा चांदोबा येऊ का, पाठीवर पाय तुझ्या देऊ का' यासारखी 'युगाणी' आम्ही दहा वर्षांपूर्वी प्रकाशिली होती. लोककाव्यातून अध्यात्म सांगण्याचा उपक्रम संतांकरवी पूर्वीच झाला होता. त्याच्या धर्तीवर बाळगाण्यांतून विज्ञान लोकाळण्याचा तो प्रयोग होता. ती युगाणी आमच्या मुलींनी लहानपणापासून मौजेने म्हटली. त्या बरीच वर्षे अमराठी परिसरात

वाढल्या तरी त्यांनी ती समजून उमजून ध्यानात ठेवली. आता अमेरिकेत जन्मलेला व वाढलेला आमचा दोन तीन वर्षांचा नातूही 'गल्याचे गाणे' फितीवरून ऐकताना 'धाव धाव धावेन' किंवा 'रोळता लोळता भुइवरती' या ओळींबरोबर धुडगूस घालतो.

बाळगाणी ही अशी संस्कृतीची वाहक होत असतात. कुटुंब आणि समाज यांच्या परिसरातून लहान मुले ती ऐकतात, ग्रहण करतात आणि स्वतः म्हणतात. मातृभाषा शिकण्याची क्रिया मुलाच्या अंतरंगात होत असते तिच्यातच गाणी शिकणे अंतर्भूत असते. भाषेतले काही शब्द सुरुवातीला पूर्ण अर्थ न कळताही मूल पोपटपंचीत असते त्याचप्रमाणे बाळगाणीही म्हणत जाते. त्याच्या मनात गाण्यांचा अर्थ हळूहळू उकलत आणि रुजत जातो. जाणत्या वयात ज्याच्या त्याच्या व्यक्तित्वानुसार त्यांचा नवीन अर्थही भावत राहतो. एका पिढीकडून दुसरीकडे, भाषेवाटे संस्कृती अशी झरत असते. बाळाच्या मनात भविष्यकाळात कसली संस्कृती विकासणार आहे हे काही प्रमाणात त्याच्या तोंडच्या बाळगाण्यांवरून ठरते.

आजच्या समाजातली मुले अडीचतीन वर्षांच्या वयापासून शाळेसारख्या, कुटुंबाबाहेरच्या सामाजिक परिसरात वावरू लागतात. तेथे घराबाहेरची माणसे त्यांना काहीबाही 'शिकवीत' असतात. भाषा-संस्कृती ग्रहण करण्याचा आरंभ या वयातच होत असतो. त्यातल्या कोऱ्या ग्रहणक्षमतेमुळे मुले ते शिकवणे उचलीतही असतात. या शिकवण्यातला मोठा भाग बाळगाण्यांचा असतो. त्यामुळे आजच्या लहान मुलांची भावी संस्कृती काही अंशी तरी या शाळांमधल्या प्रचलित बाळगाण्यांवरून ठरणार आहे.
आपल्या समाजाची वाटचाल विज्ञानावर आधारलेल्या संस्कृतीकडे सहजपणे होत आली असती तर युगाण्यांसारखी बाळगाणी या शाळांमध्ये ऐकू आली असती. पण भौतिक तंत्रज्ञान आपल्याकडे इंग्रजी भाषेतून इंग्रजांच्या अमलाखाली आले. इंग्रजांचा अंमल संपला तरी विज्ञान आपल्या संस्कृतीत झरण्याऐवजी इंग्रजी भाषेचा प्रसार मात्र धरणफुटीच्या पुरासारखा समाजभर विस्तारत आहे. अलीकडे या पुराचे गढूळ पाणी इंग्रजी माध्यमाच्या रूपाने बालवाड्यांपर्यंत पोचले आहे. त्यामुळे कोवळ्या वयातच बाळगाण्यांच्या स्वरूपात इंग्रजी भाषिक-सांस्कृतिक परिसर मराठी मुलांना वेढीत आहे. उच्च शिक्षण घेऊन परदेशात पोचलेल्या प्रगत आईबापांच्या मुलांना साहजिकच अमराठी परिसरात वाढावे लागत आहे. यामुळे नव्या पिढीच्या मनातली भावी संस्कृती एकूण किंवा बहुसंख्य मराठी समाजाहून किती अनिष्टपणे वेगळी असेल याची काळजी विचारवंत करू लागले आहेत. इंग्रजी गाणी म्हणत नाचणाऱ्या पुष्कळ मुलांच्या पालकांना त्यांच्या अपटुडेटपणाचा अभिमान वाटत असतो. दुर्दैवाने एकंदर सामाजिकता परकी असलेल्या त्या गाण्यांचा अर्थ तर सोडाच, त्यांचे शब्दसुद्धा मुलांना नीट म्हणता येत नसतात किंवा माहीत नसतात.

याबाबतीत आजच्या परिस्थितीची तुलना गेल्या शतकातल्या इंग्रजीदास्याच्या अवस्थेशी करता येईल. रवींद्रनाथांनी आपल्या 'आठवणीं'मध्ये लहानपणीच्या शाळेतल्या गाणीगानाचे प्रत्ययकारी वर्णन केले आहे :

'त्या शाळेतली एकच पद्धत मला आठवते. वर्ग सुरू व्हायच्या आधी सगळ्या मुलांना गॅलरीत एका रांगेत बसावे लागे आणि पदे गाण्याच्या किंवा घोळून म्हणणयाच्या क्रियेतून जावे लागे. उघडच, रोजच्या घाणावटीत काहीसा उल्हास आणण्याचा तो प्रयत्न असे.

'दुर्दैवाने बोल इंग्रजी होते आणि सूर तितकेच परके व त्यामुळे आम्ही काय घोकणूक करीत होतो याची पुसटशी सुद्धा कल्पना आम्हाला नसे. मैफलीच्या अर्थशून्य एकसुरीपणामुळे आम्हाला उल्हासही लाभत नसे...

'आमच्या मुखी या इंग्रजी भाषेची जी बोली बनत असे ती भाषाविज्ञानिकांची आंतरिक उन्नती केल्यावाचून राहणार नाही. मला फक्त एक ओळ आठवतेय :
'कल्लोकी पुल्लोकी सिंगिल्ल मेल्ललिंग मेल्ललिंग मेल्ललिंग.

'खूप विचारांती यातल्या काही भागाच्या मुळाचा अंदाज मला बांधता आला आहे. 'कल्लोकी' हे कशाचं रूपांतर आहे ते अजुनी मला हुलकावणी देतंय. बाकीचं मला वाटतं,होतं :

...फुल् ऑफ ग्ली, सिंगिंग मेरिली, मेरिली मेरिली
(...हर्षभराने, गात मजेने मजेने मजेने)'

सुदैवाने, या विदारक परिस्थितीतूनही (का तिच्यामुळेच?) रवींद्रनाथांची भाषा-संस्कृती शाबूत राहिली इतकेच नव्हे तर ती स्थिती नाहीशी करण्याचे कार्यच रवींद्रनाथांनी आयुष्यभर केले. त्यांनी इंग्रजीचा दुःस्वास केला नाही, उपयोग करून घेतला आणि संस्कृतीसंगमाकडे वाटचाल केली.

अशी वाटचाल करणारे, रवींद्रनाथ एकटेच नव्हते. मराठी अभिजनांनीही शंभर वर्षांपूर्वी अभिजात इंग्रजी साहित्याच्या मदतीने मराठी भाषा-संस्कृतींना समृद्ध केले. मराठीचे शिवाजी इंग्रजीला वाघिणीचे दूध म्हणत. काव्यातून क्रांतीची तुतारी फुंकणाऱ्या केशवसुतांनी इंग्रजी कवितेच्या 'सोनेरी खजिन्या'तून काढलेले कितीतरी काव्यधन मराठी साहित्यावर उधळले. किर्लोस्करांसारख्या अग्रणी नाटककाराला सौभद्र नाटकात 'कितीएक ठिकाणी इंग्लिश पद्धतीवर रस आले आहेत' असे अभिमानाने नमूद करावेसे वाटले. महात्मा फुले यांनी टामस पेनचे विचार आत्मसात केले आणि शिवाजीचा पोवाडाही लिहिला. आगरकरांनी मिल व स्पेन्सर यांचा बुद्धिवाद सुधारणेच्या आधाराला घेतला तसेच हॅम्लेटचे विकारविलसित मराठी रंगभूमीवर आणविले. नवकवी मर्ढेकरांनी 'मराठी साहित्य इतके परपुष्ट आहे की ते पुरेसे परपुष्ट नाही' अशी विरोधाभासी तक्रार करीत ऑपेराचे संगीतक केले.

याचा अर्थ असा की इतिहास वगळता फारसीसारख्या परभाषांचा असर हजम करून मराठी भाषा-संस्कृती प्रगती करत राहिल्या त्याचप्रमाणे इंग्रजीच्या प्रभावाचाही प्रतिकूल परिस्थितीतसुद्धा त्यांनी उपयोग करून घेतला. त्यामुळे आज आपण आपले भाग्य ठरवण्याच्या स्थितीत असताना, इंग्रजीचा प्रसार वाढला की मराठी धोक्यात येणार आहे असे मानण्याचे कारण नाही. मात्र इंग्रजीतून अंतरंगप्रगतीचे सत्त्व उचलणे म्हणजे इंग्रजांच्या बहिरंगचलतीचे अंधानुकरण नव्हे हे वर उल्लेखिलेल्या विचारवीरांनी ओळखले होते ते आपणही ओळखले पाहिजे.

मग बालवाडीतली मराठी मुले इंग्रजी गाणी घोकतात या घटनेचा सारासार विचार करता येईल. कळवणुकीच्या माध्यमांचा प्रसार जगभर झाला असल्यामुळे परकी भाषासंस्कृतींच्या प्रभावापासून आज कोणीही मुक्त राहू शकत नाही. अमेरिकेत शाकाहारींची संख्या वाढती आहे किंवा युरोपातल्या भाषांमध्ये इंग्रजी शब्दांचा वापर अधिकाधिक होत आहे या घटना हेच सिद्ध करतात. त्यामुळे इंग्रजीचा लोंढा आपल्यावर येतच राहणार. आपल्या मुलांना इंग्रजी शिकतही रहावे लागणार आहे. लहानपणी एकाहून अधिक भाषा शिकण्याची क्षमताही मुलांच्यात असते. त्यामुळे इंग्रजी गाणी त्यांनी म्हटली तरी हरकत नाही. पण परिसरातली भाषा मराठी असताना, इंग्रजी भाषा बळेच शिकवावी लागते आणि न कळलेली गाणी घोकून भाषाज्ञान वाढत नाही. अर्थ कळणे हीच भाषाज्ञानाची खरी खूण आहे.

गाण्याचा अर्थ कळायचा तर त्यातली संस्कृती बालवाडीच्या बाहेरच्या परिसराशी तुल्य असली पाहिजे. मराठी मुले इंग्रजी गाणी घोकतात त्यांतली संस्कृती या बाहेरच्या परिसरात त्यांच्या अनुभवाला येत नसते, ही अर्थबोधातली अडचण आहे आणि संभाव्य सांस्कृतिक दुभंगाचा धोकाही त्यातच आहे.

ही अडचण आणि धोका टाळण्यासाठी त्या गाण्यांना देशी रूप देऊन मराठीत आणले पाहिजे. अगदी आपल्याच देशातली संस्कृत गीतासुद्धा सामान्यजनांना कळण्यासाठी ज्ञानेश्वरांना देशी मऱ्हाटीत आणावी लागली. गीतेत न दिसणारी मराठी लोकसंस्कृती

ज्ञानेश्वरीत केवढी आली आहे ते प्रसिद्धच आहे. त्याच प्रकारे, इमराठी गाण्यांमध्ये मराठी वातावरणाचा आढळ व्हायला हवा. इमराठी गाणी मुलांना सहज समजतील, मग त्यावरुन इंग्रजी गाण्यांचाही अर्थबोध त्यांना होईल. इमराठी गाण्यांबरोबर मूळ इंग्रजी गाणीही नागरी लिपीत परिशिष्ट म्हणून छापली आहेत. मुलांच्या पाठांतरातली शब्दरचना निर्दोष असावी यासाठी त्यांचा संदर्भ घेता येईल. रोमन लिपीचे ओझे मुलांवर पहिल्यापासून लादायला नको.


इमराठी गाणी ही संस्कृतीसंगमाची गाणी आहेत. ती बाळगाणी असल्यामुळे बोलायला जवळची आणि कळायला सोपी हवीत. यासाठी प्रमाण मराठीतली व्याकरणशुद्ध रूपे या अनुवादांमध्ये नेहमीच आली आहेत असे नाही. 'मनीमाऊ मनीमाऊ गेलतीस कुठे?' यातला 'गेलतीस' सारखा शब्द गावरान आहे. तो इथं कशाला आणला? गावरान मराठी मुलांसाठी संस्कृती-संगम इंग्रजी-मराठीच्याच पातळीवर तेवढा व्हायला हवा असं नाही. ग्रामीण-नागरी पातळीवर मराठीतल्या मराठीतही व्हायला हवा. त्याशिवाय, जगात इतरत्र कसली गाणीबिणी चालतात हे ग्रामीण मुलांनाही समजू दे. साहेबांची पोरंसुद्धा मेंढरांची, डुकराची न कोंकराची गाणी गात्यात हे कळून त्यांचा न्यूनगंड काहीसा कमी होऊ दे. म्हणून मग इंग्रजांच्या राजधानीच्या लंडनसाठी आपल्या कहाण्यांतलं आटपाट नगर इमराठी गाण्यात आलं आणि इंग्रजी खुर्चीऐवजी भारतीय पाटाची योजना झाली. गाईला गोमाता मानणारा समाज मेंढीला 'काळी मेंढी' म्हणणार नाही, उबदार लोकर देणारी 'मेंढी काकू' म्हणेल. 'म्हातारी'ला आजीबाई म्हणेल. आणि माणसाचीच काय डुकराचीसुद्धा दाढी करायला मागताना 'न्हाव्या न्हाव्या'पेक्षा 'न्हावीदादा...' म्हणून हाक मारील. 'गॉटहॅम'च्या शहाण्यांऐवजी 'पेडगावचे शहाणे' आपल्या चांगल्या ओळखीचे, नाही का! अशा ओळखीच्या मंडळींना घेऊन बाळगाण्यांतल्या गोष्टी सांगणं तुलनेनं सोपं; शब्दचमत्कृतीवर जी गाणी आधारित असतात ती एका भाषेतून दुसरीत अनुवादणं अधिक कठीण. त्यासाठी हंसाला पोहण्यापेक्षा 'हसा'यला लावलं.

इमराठी गाणी ही अशी मराठमोळी व्हावीत. भारतातली इंग्रजीसुद्धा हिंदी-इंग्रजी, तमिळ-इंग्रजी, बांगला-इंग्रजी अशी बोली-इंग्रजी आहे. अमेरिकन इंग्रजी राणीच्या इंग्लिशपेक्षा वेगळी आहे. हे लक्षात घेऊन, इंग्रजी गाण्यांच्या नागरी रूपात मराठीतले गोळाबेरीज इंग्रजी उच्चारच ठेवले आहेत. ऑफ चं अव्ह लिहून करेक्ट इंग्लिशचा आभास कागदावर उभा केला नाही.


करेक्ट इंग्लिश किंवा अस्सल मराठी असं वास्तविक काही नसतं. संस्कृतीसंगम म्हणण्यातही काहीशी पुनरुक्ती आहे. कारण नदी जशी पात्रात होणाऱ्या अनंत संगमांची बनलेली असते तशीच संस्कृती नानाविध संगमांनी सिद्ध होते. इमराठी गाणी हा त्या अनेक संगमांतला एक.


इमराठी गाण्यांचे शब्दरूप अनेक वर्षांवर सिद्ध होत आले. त्यांना अनुरूप मराठी वळणाची चित्रे यशोदा अवचट व सचीन रास्ते या उत्साही चित्रकांनी रेखली आहेत. त्यांनी या आधी 'अक्षरे' मध्ये अक्षरांना सजीवले तशी येथे गाणी सजीवली. 'अबब हत्ती' च्या संपादकांनी १९९१ च्या दिवाळी अंकात वानगीची तीन गाणी आणि भूमिका प्रसिद्ध केली. इतकेच नाही तर त्याच्या मासिक अंकात, आणखी इमराठी गाणी रचवून छापण्याचाही उपक्रम केला. संस्कृतीसंगमाच्या आमच्या प्रयोगाला हा आनंददायक प्रतिसाद लाभला. आता जंगम कलामुद्रणच्या छपाईने पंचवीस इमराठी गाणी पुस्तक रुपात मराठी मुलांच्या पुढ्यात येत आहेत. त्यांनी ती आवडीने, समजून उमजून म्हणत या प्रयोगसंगमात डुंबून सरस्वतीचीही उपासना साधावी...

**विश्वनाथ खैरे**
**उमादेवी खैरे**



चमचम चमके    चिमणा तारा
आभाळातला जणू हिरा
नवलाई वाटते    आहेस काय
जगाच्या पार वरती ठाय







हेय हेय  डुला झुला
बोकोबा  सारंगीवाला

गाईनं मारली  चांदोबावर उडी
बघून हसला कुतरा गडी

बशी पळाली  चमचासंगं
गंमत झाली   म्हण   मला सांग











मनीमाऊ मनीमाऊ
गेलतीस कुठे

आटपाट नगरात
राणी होती तिथे




मनीमाऊ मनीमाऊ
काय करीत होती

पाटाखालच्या उंदराला
दाखवली भीती






मनीमाऊनी मारली  चुलीवर उडी
ठिणगीनं भोक पडलं  जळली ना साडी




मनीमाऊ रडते  दूध नाही मिळणार
साडीला रेशमाची  रफू कधी करणार

मनीमाउनी मोदक खाल्ले
मनीमाउनी मोदक खाल्ले

आईने पाहिले म्हणाली मने
मने तू मोदक कसे ग खाल्ले







माझा कुतरा  गेला कुठं
गेला कुठं  आता होता इथं




आखूड कान  लांबोळं शेपूट
बरोबर घेऊन गेला तरी कुठं





दाराची घंटा वाजवली कोणी
बरं नाही म्हणून छोट्याशा माउनी

नाकाला चोळा नखभर लोणी
माउचं तेच औषधपाणी



छोटी छोटी निलू बेटी
निलूचा बूट हरवला


निलू बेटी करील काय

जोडीचा बूट देऊ तिला
दोन्ही घालून चालायला



गोट्या नि चिंगी
माळावर गेली
पाण्याची बादली
आणायला


घसरला गोट्या
खोक पडली
मागून चिंगी
गडगडली




वी विली विंकी गावामधून धावला की
पायऱ्यांवर जिन्यांवर पारोसे कपडे अंगावर

खिडक्या उघडून आत बघतो
दारांच्या फटीत नजर टाकतो


म्हणतो मुलं झोपली का नाही
आठ वाजले चला करा घाई








अंड्या बंड्या भिंतीवर चढला
अंड्या बंड्या धपदिशी पडला






राजाचे सारे घोडे शिपाई
बंड्याला सांधू शकलेच नाही


बे बे मेंढीकाकू  लोकर आहे का?
होय बाबा होय  गाठी तीन बरं का

मालकाला एक अन  मालकिणीला एक
बोळीतल्या बाळासाठी राखून ठेवली एक



मेरीचं होतं छोटंसं कोकरू
सफेद बर्फी त्याची लोकरू

जिथे कुठे जाईल मेरी
चालली तिथे कोकराची स्वारी



तिच्या मागं एकदा शाळेत गेलं
हे नियमाला सोडून झालं

मुलांना हसाय खेळायला
आलं बघा कोकरू शाळेला

एक होता म्हातारा
त्याचं होतं वासरू
गोष्ट झाली सुरू

गोठ्यातून सोडलं
ओट्यावर बांधलं
गोष्ट पुरी करू



माझं गाढव चाललं नाय
तर मी त्याला मारीन काय

नाय नाय मुळीच नाय


खुंटाला नेईन
चारापाणी देईन

जगात त्याला जोडच नाय




पेडगावचे शहाणे  तिघे निघाले
डोणीत बसले  दरियावर गेले





डोणी जराशी चांगली असती
तर गोष्टहि थोडी लांबली असती



टोपाला कितीक लागतील केस
रगड झाले चार अन् वीस
चिमटीभर तपकीर दादांना बास




न्हावीदादा न्हावीदादा
डुकरोजींची दाढी करा



दाढीवाला बुवा बोलला मला
तळ्यातल्या गोळ्या असतात केवढ्या

सुचलं मला ते सांगितलं त्याला
जंगलातले मासे असतात तेवढ्या


म्हणतात संत सखुबाईंनी
खवीसाचं नाक ओढलं
गरमगरम चिमट्यानी



खविसाची मग किंकाळी
पाच कोस ऐकू गेली
सगळ्या लोकांच्या कानी

एक होती म्हातारी
टेकडीच्या आत राहणारी

जर अजून गेली नसेल
तर तिथेच रहात असेल




आजीबाई उभ्या   जवळ काय
पाण्यानं भरला   टब टब टब
आजीबाई उभ्या   करतात काय
कपडे धुतात   धब धब धब
कपड्यांचा निघेल   मळ मळ मळ
कपडे करतील   झळ झळ झळ



कपडे घालतील   नटतील थटतील
आजीबाई जातील   कुरणात नाचतील





हंस हसला हंस हसला हस रे हंसा हास
हंस हसला पुन्हा ह हा हा शाबास हंसा हास



हसऱ्या हंसा भुरक्या बदका
पंख तुमचे गुंफून टाका

राजाची लेक घेउन या
नदीवरून उडत जा



पिंटूशेठ पाजवे
रहायचे छोट्या घरात
अन मासे धरायचे
शेजाऱ्याच्या चरात



घुबड आलं घूघू करीत
मुलगा पळाला भिऊन घरात

छोटासा मुलगा कोठारात आला
गवताच्या गंजीत झोपून गेला

☆☆☆

ट्विंकल ट्विंकल लिट्ल स्टार
हाउ आय वंडर व्हॉट यू आर
अप अबव्ह द वर्ल्ड सो हाय
लाइक अ डायमंड इन द स्काय

२

हे डिडल डिडल
द कॅट अँड द फिडल
द काऊ जंप्ड ओव्हर द मून
द लिट्ल डॉग लाफ्ड
टु सी सच स्पोर्ट
अँड द डिश रॅन अवे विथ द स्पून

३

पुसी कॅट पुसी कॅट
व्हेअर हॅव यू बीन
आय हॅव बीन टु लंडन
टु लुक ॲट द क्वीन

पुसी कॅट पुसी कॅट
व्हॉट डिड यू देअर
आय फ्रायटन्ड अ माउस
अंडर द चेअर

☆☆☆

☆☆☆

४

पुसी कॅट मोल जंप्ड ओव्हर ए कोल
अँड इन हर बेस्ट पेटिकोट बर्न्ट अ ग्रेट होल
पुअर पुसी'ज वीपिंग शी'ल हॅव नो मोअर मिल्क
अंटिल हर बेस्ट पेटिकोट्'स मेंडेड विथ सिल्क

५

पुसी कॅट एट द डंप्लिंग्ज
पुसी कॅट एट द डंप्लिंगज्
ममा स्टुड बाय
अँड क्राइड ओ फाय
व्हाय डिड यू ईट द डंप्लिंग्ज

६

ओ व्हेअर ओ व्हेअर, हॅज माय
लिट्ल डॉग गॉन
ओ व्हेअर ओ व्हेअर कॅन ही बी
विथ हिज ईअर्स कट शॉर्ट अँड
हिज टेल कट लाँग
ओ व्हेअर ओ व्हेअर इज ही

☆☆☆

☆☆☆

७

हू'ज दॅट रिंगिंग ॲट माय डोअरबेल
ए लिट्ल पुसी कॅट दॅट इझन्ट व्हेरी वेल
रब इट्स लिट्ल नोज विथ ए लिट्ल मटन फॅट
दॅट्स द बेस्ट क्युअर फॉर ए लिट्ल पुसी कॅट

८

लिट्ल बेटी ब्लू
लॉस्ट हर हॉलिडे शू
व्हॉट कॅन लिटल बेटी डू
गिव्ह हर अनदर
टु मॅच द अदर
अँड देन शी मे वॉक आऊट इन टू

९

जॅक अँड जिल वेंट अप द हिल
टु फेच अ पेल ऑफ वॉटर
जॅक फेल डाउन अँड ब्रोक हिज क्राउन
अँड जिल केम टंबलिंग आफ्टर

☆☆☆

## १०

वी विली विंकी रॅन थ्रू द टाउन
अप्स्टेअर्स अँड डाउन्स्टेअर्स
इन हिज नाइट्गाउन
रॅपिंग ॲट द विंडो क्राइंग थ्रू द लॉक
'आर द चिल्ड्रेन ऑल इन बेड
फॉर नाऊ इट्'स एट ओक्लॉक'

## ११

हम्टी डम्टी सॅट ऑन ए वॉल
हम्टी डम्टी हॅड अ बिग फॉल
ऑल द किंग्'ज हॉर्सेस
अँड ऑल द किंग्'ज मेन
कुड'न्ट पुट हम्टी टुगेदर अगेन

## १२

बा बा ब्लॅक शीप हॅव यू एनी वूल
यस सर यस सर थ्री बॅग्ज फुल
वन फॉर माय मास्टर अँड वन फॉर हिज डेम
वन फॉर द लिटल बॉय दॅट लिव्हज डाउन द लेन

☆☆☆

☆☆☆

## १३

मेरी हॅड ए लिटल लॅंब
इट्स फ्लीस वॉज व्हाइट ॲज स्नो
अँड एव्हरिव्हेअर दॅट मेरी वेंट
दॅट लॅंब वॉज शुअर टु गो

इट फॉलोड हर टु स्कूल वन् डे
दॅट वॉज अगेन्स्ट द रूल
इट मेड द चिल्ड्रेन लाफ अँड प्ले
टु सी अ लॅंब ॲट स्कूल

## १४

देअर वॉज ॲन ओल्ड मॅन
अँड ही हॅड ए काफ
अँड दॅट्'स हाफ
ही टुक हिम आउट ऑफ द स्टॉल
अँड पुट हिम ऑन द वॉल
अँड दॅट्'स ऑल

☆☆☆

☆☆☆

## १५

इफ आय हॅड ए डाँकी दॅट वुड नॉट गो
वुड आय बीट हीम? ओ नो नो
आय्'ड पुट हिम इन द बार्न अँड गिव्ह हिम सम कॉर्न
द बेस्ट लिटल डाँकी दॅट एव्हर वॉज बॉर्न

## १६

थ्री वाइज मेन ऑफ गोट्हॅम
वेंट टु सी इन ए बोल
इफ द बोल हॅड बीन स्ट्राँगर
माय स्टोरी वुड हॅव बीन लाँगर

## १७

बार्बर, बार्बर शेव्ह अ पिग
हाउ मेनी हेअर्स विल मेक अ विग
फोर अँड ट्वेंटी दॅट्स इनफ
गिव्ह द बार्बर अ पिंच ऑफ स्नफ

☆☆☆

☆☆☆

## १८

अ मॅन इन द विल्डरनेस आस्क्ड मी
हाउ मेनी स्ट्रॉबेरीज् ग्रो इन द सी
आय आन्सर्ड हिम ॲज आय थॉट गुड
ॲज मेनी ॲज रेड हेरिंग्ज ग्रो इन द वुड

## १९

सेंट डंस्टन ॲज द स्टोरी गोज
वन्स पुल्ड द डेव्हिल बाय हिज नोज
विथ रेड हॉट टॉंग्ज व्हिच मेड हिम रोअर
दॅट कुड बि हर्ड टेन माइल्स ऑर मोअर

## २०

देअर वॉज ॲन ओल्ड वूमन
लिव्ह्ड अंडर अ हिल
ॲंड इफ शी'ज नॉट गॉन
शी लिव्हज देअर स्टिल

☆☆☆

## २१

द ओल्ड वूमन मस्ट स्टॅंड
ॲट द टब टब टब
द डर्टी क्लोद्ज
टु रब रब रब
बट व्हेन दे आर क्लीन
ॲंड फिट टु बि सीन
शी'ल ड्रेस लाइक अ लेडी
ॲंड डान्स ऑन द ग्रीन

## २२

स्वॅन स्वॅम ओव्हर द सी
स्विम स्वॅन स्विम
स्वॅन स्वॅम बॅक अगेन
वेल स्वम स्वॅन

## २३

ग्रे गूज ॲंड गॅंडर
वॅफ्ट युअर विंग्ज टुगेदर
ॲंड कॅरी द गुड किंग्ज डॉटर
ओव्हर द वन् स्ट्रॅंड रिव्हर

☆☆☆

☆☆☆

## २४

लिट्ल टॉमी टिट्लमाउस
लिव्ह्ड् इन अ लिट्ल हाउस
ही कॉट फिशेस
इन अदर मेन्'स डिचेस

## २५

देअर वॉज ए लिट्ल बॉय
वेंट इन्टु ए बार्न
ॲंड ले डाउन ऑन सम हे
ॲन आउल केम आउट ॲंड फ्ल्यू अबाउट
ॲंड द लिट्ल बॉय रॅन अवे

☆☆☆

अक्षरपरिचय फार कल्पकतापूर्ण
आणि आकर्षक आहे.


पुस्तकाची कल्पनाच फार अभिनव आहे. हे पुस्तक वाचताना,
चित्रे आणि कविता मनात मुरवून घेताना अक्षरे या
निर्जीव वस्तू राहात नाहीत. त्या जिवंत होतात.
अशा पुस्तकांची आज नितांत आवश्यकता आहे.

अक्षरांचे दृश्य स्वरुप नेहमीच्या व्यवहारात
आढळणाऱ्या वस्तूंच्या रुपात मांडण्याचा
पुस्तकातील प्रयत्न खूपच यशस्वी झाला आहे.

आणखी वाचा

**अक्षरे**
**युगाणी**
**युरेका**
**एकलव्य**
**नदीबाईचा भोंडला**





संमत